राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र.CIC/अ.क्र.६५९८/२०२६

श्री. अल्ताफ दानावाला,
318, एस.व्ही. रोड, पादचारी पुलाजवळ,
आंबोली नाका, अंधेरी (पश्चिम), मुंबई – 400058.

विरुद्ध

जनमाहिती अधिकारी
इमारत व कारखाने विभाग, 'के-पश्चिम' महानगरपालिका प्रभाग,
मुंबई-400058.

प्रथम अपिलीय अधिकारी
इमारत व कारखाने विभाग, 'के-पश्चिम' महानगरपालिका प्रभाग,
मुंबई-400058.

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०५.०८.२०२६

अपीलकर्ता	:	अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी	:	उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी	:	अनुपस्थित

मूळ अर्जाचा दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक	प्रथम अपीलाचा दिनांक	प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक
०४.०४.२०२२	--	०२.०४.२०२२	--

अपिलार्थीनी त्यांच्या जोडपत्रांमध्ये अपेक्षिलेली माहिती ही याआधीच जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलीय अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार प्रदान केली असून ती जवळजवळ ५०० पृष्ठांची असून अपिलार्थीनी या संदर्भात या आधीही याच मुद्द्यावर वारंवार माहिती मागितली असून ती प्रदान देखील केली असल्याचे विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केलेले आहे. ही बाब लक्षात घेता प्रस्तुत प्रकरणी ५०० पृष्ठांची माहिती ही या आधीच अपिलार्थीना प्रदान केली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे. ५०० पृष्ठांच्या माहितीचा तपशील जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांच्या लेखी खुलासात नमूद केलेला आहे.

आदेश

१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

२. अपिल क्र.६५९८/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-
(राहुल भा.पांडे)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०५.०८.२०२६